## प्रेसनोट

बंडगार्डन पोलीस ठाणे हददीमध्ये दिनांक १४.०६.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा च्या सुमारास मालधक्का चौक येथील मारुती मंदीराच्या शेजारी रेल्वे वसाहतीलगत एक ३० ते ३५ वर्षीय इसमाचा गळा दाबुन डोक्यात दगड टाकुन त्यास जिवे ठार मारले आहे. त्याबाबत दिनांक १४.०६.२०२३ रोजी बंडगार्डन पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरुध्द गु.र.क्र. १८०/२०२३ भादवि कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर मयताची ओळख अद्याप पर्यंत पटलेली नसुन बंडगार्डन पोलीस यांचेतर्फे सदर मयताची ओळख पटवीण्याचे अवाहन करण्यात येत आहे. सदर मयताच्या नातेवाईकांची माहिती देणा-यास योग्य ते बक्षिस देण्यात येईल तसेच आरोपींची माहिती देण्या-या व्यक्तीस योग्य ते बक्षिस देवुन त्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. सदर मयताचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे, अंगाने सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट, त्याचे उजवे हाताचे पोटरीवर "मिना" व त्याच हाताचे पोटरी हनुमानाचे चित्र गोंदलेले आहे, त्याचे अंगामध्ये विटकरी रंगाचा फुल बाहयांचा शर्ट, लाल रंगाचे बनियान, नेसणीस काळया रंगाची FENDI असे इंग्रजीत लिहीलेली ट्रॅक पॅंट, तसेच निळसर काळसर रंगाची DACXY SCATT या कंपनीची अंडरवेअर, त्याचेजवळ तपकिरी रंगाचे TRENO pride या कंपनीचे सॅन्डल मिळुन आलेले आहे.








सदर मयत इसमाबाबत काहीएक माहिती मिळाल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा

१) बंडगार्डन पोलीस ठाणे :- ०२०- २६१२३८२५
२) मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, बंडगार्डन पोलीस ठाणे :- ९८२३२०४०९०
३) संदिप मधाळे, सहा.पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस ठाणे :- ९४२२४२७८४७
४) रवींद्र गावडे, पोलीस उपनिरीक्षक, बंडगार्डन पोलीस ठाणे :- ९५९४९९३१९९

(संदिप मधाळे)
सहा. पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर